■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २८७ ■ शनिवार दि.५ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 287 ■ Saturday Dt.5 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीड शहरातील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी महिला आयोगाची गंभीर दखल..!

## आरोपी विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांना कायद्याची जरब बसेल अशी कारवाई करून पीडीतेला न्याय देणार : रूपाली चाकणकर

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपालीताई तुम्हीच पिडीतीला न्याय द्या नसता तुमच्यावरील विश्वास लोकांचा कमी होईल?**

# रश्मी अरोराच्या चौकशीची मागणी, रश्मी मॅडमच्या सीडीआरची सखोल चौकशी होणे गरजेचे?

## रश्मी अरोराच नव्हे तर अन्य ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलच्या महिलांसह अन्य कर्मचाऱ्यांचे चौकशीमध्ये पितळ उघडे पडेल?

## महिला आयोगाच्या रूपालीताई चाकणकर बीडच्या लैंगिक शोषणाच्या आरोपींना सुतासारखे सरळ करा?

## रूपालीताई नुसत्या कारवाया करून जमत नसतं थेट खाकीच्या रूपात त्यांना धाक दाखवा?

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील उमाकिरण शिक्षण संकुलनात एका अल्पवयीन विद्यार्थिनीचा लैंकिग छळ करण्यात आला होता. ही घटना उघडकीस आल्यानंतर बीड जिल्ह्यातच नव्हे तर, राज्यात संतापाची लाट उसळली. आरोपी प्रशांत खाटोकर आणि विजय पवार यांच्या विरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल असून, दोघेही सध्या कोठडीत आहेत.आता विजय पवारचे एकेक कारणाने समोर येत आहेत. यांनी आणखीन किती अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण केलं आहे, याचा तपास सुरू आहे. अशा प्रकारची घटना



कोणत्याही मुलीवर घडली असेल तर, त्यांनी घाबरून न जाता समोर यावे, तसेच तक्रार दाखल करावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थिनीवरील विनयभंग प्रकरणी राज्य महिला आयोगानं गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी आणि सर्व प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी सांगितले.





सदरील प्रकरण गुरु-शिष्याच्या नात्याला काळीमा फासणारा असून, चीड अणणारा आहे. यातील आरोपी विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांवर कायद्याची जरब बसेल अशी कारवाई करुन पीडितेला न्याय देणार असल्याचे सांगितले तसेच २०२३ मध्येही अशीच तक्रार विजय पवार विरोधात आलेली होती. असा उल्लेख केला असून याप्रकरणी चौकशी करुन गुन्हा दाखल करण्याची सूचना केली. यामुळे विजय पवारचे पाय आणखीन खोलात गेल्याचे दिसून येत आहे. पवार व खाटोकरला मदत करणाऱ्यांनाही उघडे पाडून त्यांच्यावर ही कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक कार्यालयात पत्रकार परिषदेत बोलताना रूपाली चाकणकर

पान २ वर



**डॉ. ज्योती मेटे यांनी घेतली महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची भेट**

बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांची शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांनी बेबील शासकीय विश्रामगृह येथे भेट घेतली. यावेळी बीड येथे उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेल्या घृणास्पद प्रकरा संदर्भात पोलीस बंत्रणेकडून निपक्ष चौकशी होऊन पुढील योग्य ती कारवाई होईल याकडे जातीने लक्ष द्यावे अशी विनंती केली आहे.

### तक्रारीची त्याचवेळी दखल का घेतली नाही?

एका पालकाने तीन दिवसांपुर्वी माध्यमांसमोर येत स्वत:च्या मुलीसोबत २०२३ मध्ये विजय पवार व त्याच्या साथीदाराने केलेल्या कृत्याचा पाढा वाचला. निवेदन देखील दिले आहे. वास्तविक पाहता २०२३ मध्येच त्या पालकांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दिली होती. त्याचवेळी कारवाई का केली गेली नाही? याची देखील चौकशी करण्यात येणार असून तक्रारीची दखल न घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई देखील करण्यात येणार असल्याचे रूपाली चाकणकर यांनी सांगितले.

### पोलीस अधीक्षक यांचे कौतुक!

हे प्रकरण उघड होताच गुन्हा दाखल करुन योग्य ती कारवाई केली. दोनच दिवसात याप्रकरणी सर्व सीसीटीव्ही फुटेज, लॅपटॉप, संगणक, मोबाईल जप्त केले आहेत. तसेच मी गुन्हा दाखल झाल्यापासून पोलीस अधीक्षक यांच्या संपर्कात आहे. त्यांनी यामध्ये खूप चांगली भूमिका आणि तपास केला आहे असे म्हणत पोलीस अधीक्षक यांच्या कामाचे कौतुक केले.

### रश्मी आरोरा यांच्या चौकशीची मागणी

उमाकिरण प्रकरणातील आरोपी विजय पवार याची ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल ही इंग्रजी शाळा आहे. या शाळेवर मुख्याध्यापक असणाऱ्या रश्मी आरोरा यांनी विजय पवार यास पळून जाण्यासाठी मदत केल्याची शंका उपस्थित केली जात आहे. यामुळे या आरोरा मॅडमचा ही सीडीआर काढण्यात यावा तसेच या दिशेने तपास आणि चौकशी करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# माजलगावात दबडगावकर कॉलनीत खून?

## रोडवर बसल्यामुळे वाहन चालकाने जोरात ढकलुन दिल्याने सय्यद मैनुदीन जागीच ठार

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मनुरवाडी येथील रहिवासी असलेले सय्यद मैनुदीन वय ५० वर्षीय इसम रस्त्याच्या कडेला बसलेला असताना एका वाहनातील चालकाने त्यास जोरदार ढकलले असता डोक्याला मार लागल्यामुळे हा इसम जागीच ठार झाल्याची घटना काल दि. जुलै शुक्रवारी रोजी साडेचार वाजण्याच्या सुमारास दबडगावकर कॉलनी या ठिकाणी घडली आहे.



माजलगाव शहर पोलीस ठाण्या लगत व मुख्य रस्त्याच्या बाजूला असलेल्या दबडगावकर कॉलनी या ठिकाणी मनुरवाडी येथील इसम सय्यद मैनुदीन वय ५० या मनुरवाडी हे रस्त्याच्या बाजूला बसलेला असताना या ठिकाणाहून वाहन जात नसल्यामुळे एका चार चाकी वाहन चालकाने आपले वाहन काढता येत नसल्यामुळे त्यांनी सय्यद मैनुदीन यांना बाजुला करण्याच्या नादात त्यास जोराचा धक्का दिल्याने सय्यद मैनुदीन खाली पडले. यात मैनुदीन खाली पडल्याने त्याच्या डोक्याला जोराचा मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याचे घटनास्थळावरील नागरिकांनी सांगितले. या सर्व घटनेचा एका बँकेच्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये सर्व घडलेली घटना असल्याचे सांगितले जात असून पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतला असल्याचे सांगितले जाते.

याबाबत पोलिसांना तो वाहन चालक कोण याबाबत विचारणा केली असता तपास चालू आहे असे सांगण्यात आले. घटनास्थळाचा पोलिसांनी पंचनामा केला असून रात्री उशिरापर्यंत शवविच्छेदन झालेले नव्हते यामुळे रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता.

### आ. संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून निराधारांना आधार

# संजय गांधी, श्रावणबाळ योजनेचे नवीन ३७८ प्रस्ताव मंजूर

बीड । प्रतिनिधी



बीड ग्रामीण व शहरी भागातील ३७८ निराधार, दुर्बल लोकांचे संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजनेंतर्गत प्रस्ताव मंजूर झाले असून आ. संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकारातून आणि प्रयत्नातून निराधारांना आधार मिळणार आहे.

पात्र वयोवृद्ध निराधार, अपंग, विधवा, परित्क्त्या, दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या समाजातील दुर्बल घटकांना शासनाकडून संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य केले जाते. बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील नागरिकांच्या, या योजनांच्या प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करून निकषपात्र नागरिकांना लाभदेण्याचे निर्देश आ. संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिले होते. त्यावर प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर कार्यवाही करत २९ मे २०२५ च्या बैठकीत संजय गांधी निराधार योजनेंतर्गत शहरी भागातील ४५ तर ग्रामीण भागातील ६२ नागरिकांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. यासोबतच श्रावणबाळ सेवा निवृत्ती वेतन योजनेंतर्गत शहरी भागातील ४६ तर ग्रामीण भागातील २२५ नागरिकांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. दरम्यान काही अर्ज त्रुटीत असून त्याच्या पुर्ततेसाठी तहसील कार्यालयात संपर्क करण्याचे आवाहनही आ. क्षीरसागर यांनी केले आहे.

# जिवे मारण्याची धमकी देत जातीवाचक शिवीगाळ, मारहाण; ४ विरोधात गुन्हा दाखल

## तलवाडापासून जवळच असलेले बगेवाडी येथील घटना

तलवाडा । प्रतिनिधी

गंगुबाई गंगा भोसले आणि त्याच्या वडील बाजीराव काळे व आई लक्ष्मी काळे यांना मारहाण, शिवीगाळ केल्यामुळे गावातीलच दिपक वावरे, राम वावरे, शेख शहद, महमूद शेख, याने मारहाण, शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी अशा शब्दात धमकी या प्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशन मध्ये गंगुबाई भोसले यांच्या फिर्यादी वरून अनु. जाती अनु जमाती प्रतिबंधात्मक कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

या बाबत सविस्तर असे की, गंगुबाई भोसले आणि त्याचे वडील बाजीराव काळे, आई लक्ष्मी काळे, बागेवडी येथे मजुरी करून आपली उपजीविका भागवतात या कुटुंबाला गावातीलच दिपक गुलाबरावं वावरे, राम अंकुशरावं वावरे, शेख साहेद शेख अब्दुल, महमूद शेख याने त्रास दिला असून गंगुबाई भोसले यांच्या घरी जाऊन २८ जून रोजी सायंकाळी ७ वाजता बगेवाडी येथील गटनं ३१४,१४४ येथील राहत्या घरी येऊन लाथा बुक्याने मारहाण, शिवीगाळ केली. अश्लील भाषेत शिवीगाळ मारहाण करत जातीवाचक शिव्या दिल्या इतकेच नव्हे तर तुला उचलून घेवून जाईल असे धकावत तुला काय करायचे ते कर म्हणत जिवे



मारण्याची धमकी दिली. सदरील घटनेचा व्हिडीओ शूटिंग आहे. या प्रकरणी गंगुबाई गंगा भोसले यांनी तलवाडा पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली असून त्यांच्या फिर्यादी वरून आरोपी दिपक वावरे, राम वावरे, शेख शायद, महमूद शेख यांच्या विरोधात अनु.जाती अनु जमाती प्रतिबंधात्मक कायद्या नुसार कलम ३(१)ी, कलम ३(१)ी, ३(२)(ीं) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री निरज राजगुरू हे करत आहेत.

# नैसर्गिक शेतीला कौशल्याची जोड गरजेची : डॉ. ठोंबरे

### कृषि सप्ताह अंतर्गत शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम

केज । प्रतिनिधी

रसायनांच्या अतिरिक्त वापरांमुळे जमिनीचा पोत असंतुलित झाला आहे. शेतकऱ्यांना तंत्रज्ञान संवादातून सक्रिय करावे लागणार आहे. नैसर्गिक शेती अभियानात पशु पालकांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. जेणे करून, निविष्ठावरील खर्च कमी होईल. शेतकरी पशुपालकांनी उत्पन्न वाढीसाठी नैसर्गिक शेतीला तंत्रज्ञान आधारित कौशल्याची जोड देणे गरजेचे आहे असे मत अध्यक्षीय समालोचनात कृषि महाविद्यालय लातूरचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांनी जवळबन ता. केज येथे दि.०३ जुलै गुरूवार रोजी कै. भानुदासराव करपे यांच्या सहावे पुण्यस्मरणा निमित्त आयोजित भव्य शेतकरी मेळावा व व्याख्यान कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केले.



कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून वनश्री पुरस्कार प्राप्त सुधाकर देशमुख, विजय पवार व इरफान शेख यांची उपस्थिती होती. डॉ.ठोंबरे पुढे असे म्हणाले की, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात शेतकरी देवो भव ! हा विचार आहे. मनुष्य–शेती– पशुधन हे निसर्गचक्र असून ते सकारात्मक व योग्य दिशेने गतीमान असणे आवश्यक आहे. शेतीमध्ये प्रगती साधण्यासाठी गटशेती ही काळाची गरज आहे. गटशेती ही शाश्वत शेतीचा प्रभावी पर्याय ठरू शकते.यामुळे मजुर टंचाईचा प्रश्न कमी होऊन उत्पादन खर्च घटून शेतीचे निव्वळ उत्पन्न वाढते. यावेळी सुधाकर देशमुख यांनी निसर्गा कडे चला हा नारा देऊन वृक्ष लागवडीचे महत्व विशद केले. त्यांनी एक पेड माँ के नाम या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले व वृक्ष संवर्धनाचे गीत गावुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. इरफान शेख यांनी सेंद्रीय शेतीच्या प्रमाणीकरणा बाबत सखोलमार्गदर्शन करून सेंद्रीय पद्धतीने उत्पादित केलेल्या मालांचे शुद्धतेसंदर्भात महत्व पटवून दिले.


विजय पवार यांनी त्यांच्या भाषणात सेंद्रीय कर्बाचे महत्व सांगून शेतीत शाश्वतता आणण्यासाठी नैसर्गिक शेती अभियान आवश्यक असल्याचे संबोधले.

त्यांनी पिकांचे अवशेष जमिनीत गाढून कुजवल्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो याबाबत इतंभुत तांत्रिक माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरूवातीस नारळांच्या रोपांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ड.दिलीप करपे यांनी केले तर प्रकाश करपे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी चंद्रकांत करपे, राजेभाऊ करपे, अभयसिंह करपे, भिमराव करपे, नरहरी करपे व जनक करपे यांनी विशेष परिश्रम घेतले. या शेतकरी मेळाव्यास पंचक्रोशीतील शेतकरी–पशुपालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# काँग्रेस पक्षाच्या बीड तालुकाध्यक्षपदी गणेश बजगुडे पाटील यांची फेरनिवड

बीड । प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या महासचिव राज्यसभा खासदार रजनीताई अशोकराव पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या नेतृत्वात जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांनी काल दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी बीड जिल्ह्यातील ११ तालुकाध्यक्षांच्या निवडी जाहीर करुन नियुक्तीपत्र देण्यात आले. यामध्ये बीड तालुका काँग्रेस अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा एकदा गणेश दादा बजगुडे पाटील यांना देण्यात आली.



गणेश बजगुडे पाटील हे मागील अनेक वर्षांपासून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणारे सर्वपरिचित धडाडीचे नेतृत्व असुन मागील कार्यकाळात पक्ष संघटनेसाठी केलेल्या कामाची दखल घेत त्यांची पुन्हा एकदा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या बीड तालुकाध्यक्षपदी निवड करत नियुक्तीपत्र देण्यात आले. ही निवड योग्य व सर्व सामान्य कार्यकर्त्यांना बळ देणारी असुन पक्ष संघटन वाढीसाठी महत्वाची ठरणार आहे. कर्तृत्व, दातृत्व व वक्तृत्वाचा त्रिवेणी संगम व तालुक्यातील वाडी वस्ती गाव खेड्यांपर्यंत असलेला प्रत्यक्ष संपर्क तालुकाभरात सर्वपरिचित व पुर्णवेळ लोकांसाठी उपलब्ध असणाऱ्या या नेतृत्वामुळे बीड तालुका व मतदार संघात काँग्रेस पक्षाला निश्चित बळकटी मिळेल. त्यांच्या निवडीबद्दल त्यांना लोकनेत्या खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे पाटील यांच्यासह विविध पक्ष संघटनेसह अनेक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

**प्रामाणिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना काँग्रेस पक्षातच न्याय मिळतो – गणेश बजगुडे पाटील**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या बीड तालुकाध्यक्षपदी गणेश बजगुडे पाटील यांची फेरनिवड झाल्यानंतर बोलताना गणेश बजगुडे पाटील म्हणाले की, मी मागील तीन वर्षाच्या तालुकाध्यक्ष पदाच्या कार्यकाळात प्रामाणिकपणे केलेल्या कामाची पावती म्हणुन माझे नेते माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब, खासदार रजनीताई अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांनी माझ्यावर ज्या विश्वासाने पक्ष संघटन वाढीसाठी पुन्हा एकदा बीड तालुकाध्यक्ष पदाची अतिशय महत्वाची जबाबदारी दिली त्या विश्वासाला कधीही तडा न जावु देता बीड तालुक्यातील सर्व जुन्या नव्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन पक्ष संघटन वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न करेल. त्याच बरोबर आगामी काळात होवु घातलेल्या सर्व जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका देखील आम्ही ताकतीने लढू आणि जिंकू असे काँग्रेसचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी सांगितले.



काल दि ०४ जुलै रोजी राहुल वैरागे यांचा वाढदिवस करण्यात आला. त्यावेळी उपस्थित महाराष्ट्र आधार सेना विद्यार्थी आघाडी तालुकाध्यक्ष अभिषेक अडागळे, देवडीचे मा.सरपंच त्रिंबक जिजा झाटे, ग्रा.प.स.महादेव लोंढे, मा.ग्रा.स.गितेश आगे, माऊली वैरागे, केशव अडागळे, जगन्नाथ लोंढे, राजेश अडागळे, सागर मेंडके, सलमान शेख, गणेश लोंढे, अगत्य गायकवाड, अदित्य अडागळे, अविनाश लोंढे, निवृत्ती साळुंके, गणेश थोरात, याकूब शेख इ उपस्थित होते.

# गंगा माऊली शुगरचा मिल रोलर पूजन कार्यक्रम संपन्न

केज । प्रतिनिधी



केज शहरालगत असलेला गंगा माऊली शुगर कारखान्याचे मिल रोलर पूजन चेअरमन लक्ष्मणराव मोरे, युवा नेते आदित्य पाटील, व्हाईस चेअरमन हनुमंत मोरे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, गंगा माऊली शुगरचे संचालक प्रवीण मोरे, संचालक अविनाश मोरे, काँग्रेसचे युवा नेते पशुपतीनाथ दांगट, आप्पासाहेब ईखे, प्रविणकुमार शेप, बाळासाहेब ठोंबरे, मुन्ना ठोंबरे, कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी.आय. मुजावर, मुख्य शेतकी अधिकारी अविनाश आदनाक आदींच्या हस्ते रोलर पूजन झाले.

पुढील हंगाम गाळपा साठी पूजन कार्यक्रम घेऊन सुरुवात करण्यात आली. पुढील हंगामात साखर कारखाना गाळपाचा अधिकचा टप्पा पूर्ण करेल असे मत आदित्य पाटील यांनी बोलतांना व्यक्त केले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना विश्वास आणि हमीभाव याबाबाबत आम्ही शब्दबद्ध आहोत. कॅपिसिटी वाढवण्या साठी गतीने प्रयत्न सुरू आहेत असे मत हनुमंत काका मोरे यांनी व्यक्त केले. रोलर पूजन कार्यक्रमास परिसरा तील नागरिक, कारखान्याचे कर्मचारी उपस्थित होते.

# आज विलास गुरू लिंबेकर यांचे किर्तन

अंबाजोगाई । प्रतिनिधी



आषाढी एकादशी रविवार ६ जुलै रोजी अंबाजोगाई शहरातील आदर्श वसाहत भागात असलेल्या कपिल गणेश मंदीरात गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने सांय. ०६ वा. परभणी येथील ह.भ.प. विलास गुरू लिंबेकर यांची नारदीय किर्तन सेवा आयोजित केली असून भक्तांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजन समितीने केले आहे.

पान १ वरून...

## रश्मी अरोराच्या चौकशीची मागणी, अरोरा मॅडमच्या रश्मी सीडीआरची सखोल चौकशी होणे गरजेचे?

यांनी सांगितले.

पुढे बोलताना चाकणकर म्हणाल्या, बीड जिल्ह्यातील खासगी शैक्षणीक संस्थांचा त्याअनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांमध्ये आढावा घेतला जाईल. अशा घृणास्पद प्रकाराच्या शिकार झालेल्या मुलींनी तक्रारीसाठी पुढे यावे असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले. बीड शहरातील उमाकिरण शैक्षणीक संकुलात एका खासगी क्लासेसच्या संचालक आरोपी विजय पवार व त्याचा साथीदार प्रा. प्रशांत खाटोकर या दोघांनी अल्पवयीन विद्यार्थीनीचा लैंगिक छळ केल्याची घटना उघडकीस आल्यानंतर सर्वत्र सताप व्यक्त केल्या जाऊ लागला. दरम्यान या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेवून महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर ह्या आज बीडच्या जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्या असता त्यांनी पिडीत अल्पवयीन मुलीची भेट घेतली तसेच अन्य घटनांमधील पिडीतांच्या केस संबंधीत केलेल्या कार्यवाहीची माहिती देखील जाणून घेतली आहे. यानंतर पोलीस अधीक्षक कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना चाकणकर म्हणाल्या की, उमाकिरण प्रकरण चीड आणणारे असून, तिथे हजार पेक्षा जास्त मुली असताना एकही महिला कर्मचारी नाही याबाबत खेद व्यक्त करीत या प्रकरणात पीडितेला न्याय आणि आरोपींना कठोर शासन व्हावे यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असे रूपाली चाकणकर यांनी सांगितले.

# नाही पांडुरंगा ठायी, भावेचि भक्ती घडवी ठायी

## अष्टपुत्र परिवाराचा भक्तिभावाने फुलतो आषाढी महोत्सव







बीड शहरातील संभाजीनगर परीसरात अष्टपुत्र (विधाते) परिवार गेली १४ वर्षापासून अखंडपणे आषाढी एकादशी निमित्ताने आषाढी महोत्सवाचं देखणं आयोजन केलं जातं. नगरसेविका सौ.जयश्री विलास विधाते व सामाजिक कार्यकर्ते श्री विलास विधाते यांच्या पुढाकारातुन चौदा वर्षांपासून प्रज्वलित केलेला भक्तीभावाचा दीप समाजासाठी प्रेरणादायी ठरतो आहे. वारकरी संप्रदायाच्या परंपरेला जपत, आपल्या घरातचं पंढरपूर निर्माण केलं जातं. पुर्णतः स्वखर्चातून साजरा होणाऱ्या उत्सवातुन प्रसिद्धीचे प्रदर्शन न करता सेवाभाव आणि भक्तीचं दर्शन घडवणारा हा उत्सव अनेक पांडुरंग भक्ताला भावतो आहे.

प्रत्येक वर्षी आषाढी एकादशी व द्वादशी दोन दिवस महापूजा, हरिपाठ, भजन–कीर्तन, महाप्रसाद, आणि वारकरी परंपरेचा जिवंत अनुभव देणारे कार्यक्रम त्यांच्या पुढाकाराने होत असतात. अत्यंत श्रध्देने मंत्रोच्चारासह विठ्ठल–रुक्मिणीची पूजा केली जाते. परीसरातील बालकां पासून ते वृद्धांपर्यंत महिला पुरुष भाविक भक्त महापुजे मध्ये सहभागी होतात.

स्थानिक कलाकार, वारकरी मंडळी, यांच्या द्वारा अभंग, भजन, भक्ती गीतांचे गायन व हरिनामाच्या गजरात सुश्राव्य भक्ती रजनी साजरी होते. आदरतिथ्याने दोन दिवस अन्नदानाचे नियोजन करून द्वादशीला महाप्रसाद असतो. कोणताही भेदाभेद न करता सर्वांसाठी खुला असलेला महाप्रसादाचा कार्यक्रम सामाजिक समरसते चे प्रतीक ठरला आहे. महोत्सावातुन सेवाभावी वृत्तीचे दर्शन घडतं. विठ्ठल नाम स्मरणातुन निर्माण होणारा भक्तीरस इथं अनुभवता येतो. भक्त भावनांनी पुजतो, तिथं देव नक्की वास करतो! खरं तर हाच महोत्सवाचा आत्मा असावा. कुठला ही गाजावाजा न करता भक्तिभावानं पंढरपूरची अनुभूती अष्टपुत्र परिवाराच्या महोत्सवा मुळे येते. सातत्याने १४ वर्षां पासून वाहणारा हा भक्तीचा झरा भक्ती भावाने जपला जातोय. बीड शहरातील संभाजीनगर परिसरात भक्त पंढरी निर्माण होते.



निश्चितच हा उपक्रम कौतुकास्पद आहे. हा उपक्रम नवी दिशा देतो, संस्कृती टिकवतो. भक्ती सेवाकार्या मुळे परीसरातील नवी पिढी संत परंपरेशी जोडली जाते, तर ज्यांना पंढरीला जाणे अवघड आहे, अशा विठ्ठल भक्तांना येथेच पंढरपूरला न जाता, पांडुरंगाचं दर्शन घडत हे दाखवून देणाऱ्या विधाते परिवाराला पांडुरंग काहीही उणं पडू देणार नाही.

नाही पांडुरंगा ठायी, भावेचि भक्ती घडवी ठायी

रामकृष्णहरी

**प्रा. सौ. संगीता शिंदे (पवळ)**

# वेलडन असरार भाई..!

## 'जे कुणाला जमला नाही ते हाजी असरार भाई यांनी करून दाखविला'

बीड : शहराती ल वार्ड क्रमांक १७ अजित पुरा या भागात एक गल्लीत गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून रखडलेली होती. मात्र या गल्ली नालीचा त्रास गल्लीतल्या राहणाऱ्या माणसाला खूप त्रास सहन करावा लागत होता.

येथील बीड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट, योगेश भैया क्षीरसागर यांचे कार्यकर्ते (समाजसेवक) हाजी शेख असरार यांना गल्लीत राहणाऱ्या लोकांनी सांगितले की आम्हाला ह्या गल्लीत तुंबलेले पाणी आणि पावसात नालीत जमलेले गढूळ पाणीच्या खूप त्रास सहन करावा लागते असा लोकांनी शेख असराल यांना सांगितले. आम्ही नगरपालिकांना अनेक वेळेस निवेदन पण दिले पण त्यांनी काहीच केलं नाही फक्त आम्हाला त्यांनी सांगितलं की आम्ही करून घेऊ पण आता पाऊस सुरू होणार आहेत आणि तो नालीतला पाणी आमच्या घरात घुसणार. असा गल्लीतले राहणाऱ्या माणसांनी त्यांना सांगितले. हाजी असरार भाई यांनी तो समस्या मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब (संपादक) व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी ती गल्ली कमीत कमी तीन ते चार दिवसांमध्ये सिमेंट कॉंक्रेट गल्ली संपूर्ण करून दिली आणि नळाचे पाईप पण लावून दिले. आणि




आसरार भाई यांनी ते लोकांचे समस्या पूर्ण करण्याच्या प्रयत्न केला आणि त्या प्रयत्नात त्यांना यश मिळाले.

गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून रखडलेली तो गल्ली डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर यांचे कार्यकर्ते हाजी शेख असरार (समाजसेवक) यांनी तो प्रश्न मिटवला. आणि लोकांना तो गल्ली बनवून दिली त्यात डॉक्टर योगेश भैया क्षीरसागर यांचे आणि हाजी असरार भाई यांचे आभार मानले.

बीड शहरात वार्ड क्रमांक १७ मध्ये अनेक नाल्या गल्ल्या आणि रस्ते यांनी चांगलेच केले मात्र त्यांनी त्याच्या अगोदर उद्घाटन केला नाही त्यांनी त्याच्या उद्घाटन सगळं काम संपल्यानंतर केले.. कारण त्यांनी सांगितले की, आम्ही दुसऱ्या सारखा आधी उद्घाटन करत नाही आम्ही विकास काम केल्यानंतर तो कामाच्या उद्घाटन करतोय... वेल्डाण असरार भाई. खरा जे कुणाला जमला नाही ते योगेश भैया क्षीरसागर यांचे कार्यकर्ते (समाजसेवक) हाजी असरार शेख यांनी करून दाखविले. विकासाच्या संदर्भात (आम्ही बोलत नाही आमच्या काम बोलतोय..) असा त्यांनी सांगितले. आणि तो गल्ली नाली त्यात गल्लीत राहणारा माणसाला करून दिला त्या माणसांनी त्यांच्या आभार व्यक्त केले आणि त्यांना सांगितले खरं असरार भाई तुम्ही आमचे मनातले नगरसेवक आहात.

नागरिकांनी असलार भाई यांचे मानले आभार..

प्रभाग क्रमांक जुना १५ नवीन १७ अजीज पुरा येथील डॉक्टर साबेर अली गल्ली येथे मॉडेल शाळा समोरील नाली व रस्त्याचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता

या भागातील नागरिकांची अनेक दिवसापासूनची ही मागणी होती की या नाली व रस्त्याचा प्रश्न मार्गी लागावा म्हणून हा प्रश्न समाजसेवक मोहम्मद असरार यांनी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब साहेब व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधान सभा अध्यक्ष डॉक्टर योगेश भैया क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली राखडलेला रोड व नाली कॉंक्रिट काम करून दाखवला कायमचा प्रश्न मार्गी लावला व येथील नाली व रस्त्यचा काम करून घेतले.काम झाले नंतर ते गल्लीत ले नागरिकांनी मोहम्मद असरार यांचे आभार मानले व सत्कार केले आणि वचन दिले आम्ही तुमचे सोबत आहे त्या वेळी हाजी अय्युब साहब, मोलाना सलमान, अखिल सर, मोमीन जावेद, मोमीन सईद, मोमीन रिझवान, मोमीन कमरान, शेख मतीन भाई, पापा भाई, बिलाल भाई, शेख आरेफ भाई, जफर भाई उपस्थित होते.

शब्दांकन

**मोमीन तवकीर.**

**मो. ९१३०१८२३३२**

# अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी विश्वास मोहिते यांची चौथ्यांदा बिनविरोध निवड

## उपाध्यक्षपदी रत्नागिरीचे असलम शेख तर कार्याध्यक्षपदी अहिल्यानगरचे दीपक मोहिते

बीड । प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्रात वर्षभर सामाजिक कार्यात सक्रिय असणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समिती महाराष्ट्र राज्य या समितीच्या अध्यक्षपदी पाडळी केसे तालुका कराड येथील सामाजिक कार्यकर्ते पत्रकार विश्वास मोहिते यांची चौथ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी रत्नागिरीचे पत्रकार सामाजिक कार्य सक्रिय असणारे असलम शेख यांची तर कार्याध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते लोक स्तंभ न्यूज चे संपादक दिपक मोहिते यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण या ठिकाणी आयोजित सर्वसाधारण सभेमध्ये या निवडी करण्यात आल्या. अध्यक्षस्थानी बाबासाहेब कांबळे होते. यावेळी कार्यकारिणी मध्ये संपतराव मोहिते कराड, बाबासाहेब कांबळे शिराळा, दिलीप कांबळे वाई, नासिर सय्यद अहिल्यानगर, विकासभैय्या शेलार महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना शेवगाव तालुका प्रमुख अहिल्यानगर, दिलीप महाजन कराड, निलेश तडाखे कराड यांच्या बिनविरोध निवडी करण्यात आल्या. यावेळी गत वर्षी



प्रमाणे अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने प्रत्येकाने आपापल्या तालुका आणि जिल्ह्यामध्ये सामाजिक उपक्रम राबवण्याचे यावेळी ठरवण्यात आले. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीच्या निमित्ताने प्रत्येकानी १ ऑगस्ट २०२५ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीमध्ये शालेय साहित्याचे वाटप, नेत्र तपासणी शिबिर, महिला प्रबोधनविषयक कार्यशाळा, सर्वधर्मसमभावाची शिकवण देणारे विविध उपक्रम राबवून ही जयंती साजरी करावी असेही या बैठकीत सर्व मताने ठरविण्यात आले. नवनियुक्त अध्यक्ष विश्वास मोहिते म्हणाले, महापुरुषांनी जात, धर्म, पंथ यापेक्षा प्रबोधनाला महत्त्व दिले, त्यामुळे आपल्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सर्वधर्मसमभावाच्या विचाराने जयंती साजरी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महापुरुषांचा जातीय सलोखा राखण्याचा विचार खऱ्या अर्थाने प्रसार करणे गरजेचे आहे. कोणत्याही महापुरुषांना अंधश्रद्धा मान्य नव्हती, महापुरुषांच्या चरित्राचे वाचन केल्यानंतर त्यांचा अंधश्रद्धेला विरोध होता आणि प्रत्येक पुस्तकातून शिक्षणाला महत्त्व दिल्याचे आपल्याला पहावयास मिळते. त्यामुळे महापुरुषांचे आवश्यक ते विचार जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण प्रयत्न करावेत. असे सांगून विश्वास मोहिते म्हणाले की चौथ्यांदा माझी बिनविरोध निवड करून माझ्यावर दाखवलेला विश्वास नक्कीच सार्थ ठरविन, महापुरुषांच्या विचारांना अभिप्रेत असणारे काम यापुढेही माझ्या हातून कळेल असा विश्वासही यावेळी विश्वास मोहिते यांनी दिला. स्वागत आणि प्रास्ताविक संपतराव मोहिते यांनी केले तर आभार विकास शेलार यांनी मानले.

# ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी विविध कार्यक्रमांनी पंधरवडा साजरा करणार : उपसरपंच गणेश लांडे

बीड । प्रतिनिधी

येत्या २६ जुलै रोजी राज्याच्या हवामान बदल व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस येत असून त्यांच्या वाढदिवसानिमित्त दि.१० जुलै ते २६ जुलै हा पंधरवाडा विविध कार्यक्रम घेऊन समाज उपयोगी वस्तूंचे वाटप करून आपण साजरा करणार आहोत, असे भारतीय जनता पार्टीचे युवा नेते व बर्हाणपूर गावचे उपसरपंच गणेश लांडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.





यामध्ये पंकजाताई यांच्या वाढदिवसाच्या छापील रजिस्टर पाच हजार वह्या यामध्ये श्री नगद नारायण शिक्षण प्रसारक शाळेच्या विद्यार्थ्यांना तसेच पसायदान सेवा प्रकल्प या ठिकाणी. तसेच पाली येथील इन्फंट इंडिया या ठिकाणी. स्नेहावली रामनगर या अनाथ मुलांच्या वस्तीगृहाला देखील ह्या वयाचे वाटप करणार असून नारायणगड या ठिकाणी गडाचे महंत शिवाजी बाबा व उत्तर अधिकारी संभाजी महाराज यांच्या हस्ते हजारो वृक्षांचे वृक्षारोपण करून तेथील भाविकांना सावलीसह फळे मिळावी या उद्देशाने हे काम आपण करणार आहोत व तसेच विविध ग्रामपंचायतींना झाडांच्या रोपांचा पुरवठा करणार आहोत. लोकांनी प्लास्टिकचा वापर कमी करून पर्यावरण संगोपनासाठी कापडी पिशव्या वाटप करणार आहोत. अनाथ मुलांच्या अनेक वस्तीग्रहांमध्ये खाण्याच्या वस्तू वाटप करून कीर्तनाचे कार्यक्रम घेऊन आपण ना.पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवसानिमित्त पंधरा दिवस सेवा पंधरवडा व कार्यक्रमाचा पंधरवाडा असे भरगच्च कार्यक्रम घेणार असून यातील काही कार्यक्रमांना लोकनेत्या पंकजाताई मुंडे ह्या देखील उपस्थित राहणार आहेत असे बर्हाणपुरचे उपसरपंच गणेश लांडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

**टी. सी हरवला आहे**

अमर अशोक भांडवलकर वर्ग १० वी या विद्यार्थ्याचा प्रवासात धारूर माजलगाव बस मध्ये टी. सी हरवला आहे जर कोणाला सापडला तर संपर्क साधा.

**अमर अशोक भांडवलकर**

**८१७७९६७१७५**

# गेवराई शहरात एकही कोंडवाडा नसल्याने जनावरे मोकाट

## गेवराई नगरपरिषदेचा हलगर्जीपणा व अकार्यक्षमतेचा प्रभाव, कोंडवाड्याअभावी जनावरे रस्त्यावर

### वाहतुकीला जनावरांचा त्रास : नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरात वाढत असलेल्या वाहतूकीच्या समस्येवर वाहतूक विभाग एक ना एक नवनवीन उपक्रम राबवून आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करीत असतानाच शहरात मोकाट जनावरांमुळे वाहतुकीची समस्या वाढतच चालली आहे. मात्र गेवराई नगर परिषदेकडे या मोकाट जनावरांना बंदीस्त करून ठेवण्यासाठी एकही कोंडवाडा नसल्याने जनावरे शहरात मोकाट फिरत आहेत. जनावरे रस्त्यांवरच ठाण मांडत असल्याने वाहतूकीला त्रास होत असून यातून अपघातही घडत आहेत. मात्र पालिकेचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष दिसून येत आहे.



शहरातील वाढती लोकसंख्या व त्याप्रमाणात वाहनांची संख्याही झपाट्याने वाढत चालली आहे. हे होत असताना मात्र रस्ते आहे तसेच आहेत. त्यात वाढ होत नसून उलट अतिक्रमणामुळे रस्ते अधिकच अरूंद होत चालले आहे. परिणामी आजघडीला गेवराई शहरातून गाडी चालविणे कठीण व धोक्याचे झाले आहे. शहरातील या अव्यवस्थीत वाहतुकीला घेऊन वाहतूक विभागाची डोकेदुखी वाढली आहे. तरिही वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी वाहतूक विभाग ट्राफीक सिग्नल, वन साईड पार्कींग सारखे उपक्रम राबवित आहे. मात्र शहरात मोकाट फिरत असलेल्या जनावरांपुढे वाहतूक विभागही नतमस्तक झाला आहे. बघावे त्या रस्त्यावर मोकाट जनावरांचे कळप दिसून येते. रस्त्याच्या मधोमध जनावरांचा डेरा राहत असल्याने त्यातून वाट काढणे कठीण होत आहे. मात्र यामागेही गेवराई नगरपरिषदेची अकार्यक्षमता लपून बसली आहे. त्याचे कारण असे की, नगरपरिषदेकडे मोकाट जनावरांना कोंडून ठेवण्यासाठी आजघडीला एकही कोंडवाडा नाही. कोंडवाडा नसल्याने रस्त्यावर फिरत असलेल्या जनावरांना पकडून डोकेदुखी पाळण्याच्या नादात नगरपरिषद पडत नाही. नगरपरिषदेचा हलगर्जीपणा व अकार्यक्षमतेचा प्रभाव शहरातील वाहतुकीवर पडत असून शहरवासीयांसह वाहतूक विभागाचीही डोकेदुखी वाढवीत आहे. त्यामुळे नगर परिषद प्रशासन केव्हा यावर योग्य पाऊल उचलते व कोंडवाड्याची व्यवस्था करून वाहतूक विभागाला सहकार्य करते याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

#### जनावरासाठी कोंडवाडा करण्यात यावा : शुभम म्हेत्रे

गेवराई शहरात जनावरे सकाळी मोकळी सोडले जातात नगर परिषदेच्या वतीने मोकाट जनावरासाठी कोंडवाडा करावा अशी सातत्याने पाठपुरावा करत देखील मागणी करण्यात येत आहे. मोकाट जनावराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जागा उपलब्ध नसल्याच्या कारणाने या विषयाकडे दुर्लक्ष करण्याचे पाप नगरपरिषद प्रशासन करत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे युवा नेते शुभम म्हेत्रे यांनी केला आहे व नगरपरिषद गेवराई च्या वतीने ठोस पावले उचलावीत अन्यथा स्टाईलने आंदोलन करू असा इशारा देण्यात आला आहे.

## राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय

### सीसीएमपी उत्तीर्ण डॉक्टरांना एमएमसी मध्ये रजिस्ट्रेशन मिळणार

बीड । प्रतिनिधी

राज्यातील एक लाख होमिओपॅथी डॉक्टर गेल्या दहा वर्षापासुन ज्या निर्णयाच्या प्रतीक्षेत होते तो निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सीसीएमपी उत्तीर्ण डॉक्टरांना एमएमसी मध्ये रजिस्ट्रेशन मिळणार आहे. २०१४ साली राज्य सरकारने होमिओपॅथी डॉक्टरांना रुग्णसेवेसाठी ऍलोपॅथी औषध वापरण्याची परवानगी दिली. सीसीएमपी कोर्स एमबीबीएस कॉलेजमध्ये सुरू केला. गेल्या दहा वर्षांपासुन या सीसीएमपी कोर्स उत्तीर्ण डॉक्टरांची नोंदणी देणे कायद्याने एमएमसीला बंधनकारक असुनही ते देत नव्हते. परंतु आता राज्य सरकारने हस्तक्षेप करत तातडीने रजिस्ट्रेशन देण्याचे जाहीर केले आहे. यामुळे राज्यातील एक लाख होमिओपॅथी डॉक्टर्स आरोग्य व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहामध्ये येणार आहेत.

सोबतच होमिओपॅथी डॉक्टरांना वन झिरो एट अम्बुलन्स नोकरी, प्राथमिक आरोग्य केंद्रात मेडिकल ऑफिसर नोकरी, सीएचओ पदांची नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. होमिओपॅथी डॉक्टरांना अलोपॅथी प्रॅक्टिसची परवानगी व सीसीएमपी कोर्स आणि एमएमसी रजिस्ट्रेशन मिळण्यासाठी गेल्या वीस वर्षापासुन महाराष्ट्र राज्य होमिओपॅथी डॉक्टर्स कृती समिती सातत्यपूर्ण संघर्ष व आंदोलन करत आहे. राज्यभरातील डॉक्टरांच्या संघटित शक्तीद्वारे व सात्यत्यपूर्ण संघर्षामुळे हे यश प्राप्त झाले आहे. त्यामुळेच बीड जिल्ह्यातील डॉक्टर्सनी एकत्र येऊन ढोल ताशाच्या गजरामध्ये गुलाल उधळत एकमेकांना पेढे भरवत राज्य सरकारच्या या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत केले. यावेळी महाराष्ट्र राज्य समितीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. विजय पवार यांनी सांगितले की गेल्या दहा वर्षाच्या संघर्षला यश मिळाले असुन आता होमिओपॅथी डॉक्टरांना भविष्यात अनेक संधी प्राप्त होणार आहे. जिल्हा अध्यक्ष डॉक्टर किन्हीकर यांनी सांगितले एक लाख डॉक्टरांच्या संघटित संघर्षाचा हा प्रचंड मोठा विजय आहे. बीड तालुका अध्यक्ष डॉक्टर शेख मुबारक यांनी सांगितले की हा लढा खुपच खडतर आणि अवघड होता असे प्रसिद्ध पत्रकात सांगितले आहे.

### जिल्हा प्रशासन व मनस्विनी महिला विकास सेवाभावी संस्थेचा अभिनव उपक्रम

## पीएम श्री जि.प. माध्यमिक कन्या शाळेत बालविवाह निर्मूलन जनजागृती कार्यक्रम उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळेत जिल्हा प्रशासन, मनस्विनी महिला विकास सेवाभावी संस्था अंबाजोगाई व माजलगाव विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह निर्मूलन जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.



बालविवाह रोखण्यासाठी शासनाने अनेक उपयोजना केल्या असल्या तरी सद्यस्थितीमध्ये कुठे ना कुठेतरी बालविवाह झाल्याच्या घटना आपण पाहत आहोत. परंतु याला आळा बसण्यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे. शासनाच्या उपक्रमानुसार आता त्यांच्यासोबत स्वयंसेवी संस्था पुढे येत आहेत. माजलगाव तालुक्यातील पीएम. श्री जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळेत नुकताच बालविवाह निर्मूलन जनजागृती कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी संबंधित संस्थेच्या स्वयंसेविका प्रभा गंगणे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सांगितले की, मुलगी असेल तर १८ वर्षाच्या आत व मुलगा असेल तर २१ वर्षाच्या आत कोणीही बालविवाह करणार नाही. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून शाळेतील इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊन कार्यक्रमाचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद गरबडे हे होते. स्वयंसेविका शोभा डाके यांनी पालकांकरिता बालविवाह निर्मूलन जनजागृती विषयी माहिती देऊन अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात सर्व पालकांना विश्वासात घेऊन अतिउत्कृष्ट सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंदा सारूक यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका संगीता राठोड, जयश्री लोणीकर, ज्योती कोडगीरकर, संगीता शिंदे, बाळासाहेब सोनसळे, शरद नायबळ, सुंदर काळे, नारायण भालशंकर, चंद्रकांत यादव, बालासाहेब कांबळे, शेख अब्दुल, बालासाहेब जामकर, सौदागर हसीब, गोरख उघडे, संतोष साळवे यांनी मोलाचे सहकार्य केले.

## गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने व प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

### सौ. सिमाताई ओस्तवाल यांचा शालेय साहित्याचा यज्ञ सुरूच

बीड । प्रतिनिधी

गेल्या पंधरा वर्षापासून सातत्याने जनसेवेचा वसा आणि वारसा घेतलेल्या अशा सामाजिक क्षेत्रामध्ये बीड जिल्ह्यामध्ये नव्हतं महाराष्ट्र मध्ये अग्रेसर असलेल्या अशा गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या संस्थापक सौ. सीमाताई ओस्तवाल यांच्या श्री गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या माध्यमातून अतिशय उत्कृष्ट जनसेवेचे कार्य त्या सध्या करत आहेत आणि महाराष्ट्रामध्ये त्यांनी श्री गुरु आनंद महिला प्रतिष्ठानचे नाव या उत्कृष्ट कार्यामुळे लौकिक केले आहे. याच पार्श्वभूमीवर आज बीड येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा अजीमपुरा येथे विद्यार्थ्यांना वह्या पेन सस्पेन्सिल्स पुस्तके असे संच वाटप करून एक विद्यार्थ्यांच्या मनामध्ये एक आगळावेगळा आदर्श त्यांनी गुरु आनंद महिला प्रतिष्ठानचा व प्रयास फाउंडेशन मुंबई यांचा आदर्श निर्माण केला आहे.



या शाळेमध्ये शिकणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांना त्यांनी ज्ञानदानाचे महान कार्य शालेय पुस्तक वह्या वाटप करून एक महाराष्ट्रामध्ये आदर्श निर्माण केला आहे. कारण अन्नदान हे तात्पुरती भूक भागवते आणि विद्यादान हे कायमस्वरूपी भूक भागवत असे ही बोलले जाते. याच अनुषंगाने त्यांनी सर्व बीड जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्रातील तमाम नागरिकांच्या मनामध्ये एक आपल्या प्रतिष्ठानचा एक चांगला आदर्श निर्माण केला आहे लॉकडाऊनच्या व कोरोना महामारीच्या काळामध्ये देखील त्यांनी अनेक गोरगरीब वंचितांना स्वत: स्पॉटवर जाऊन किराणा किट धान्य वाटप केलेले आहे त्यांचे समाजसेवेचे कार्य अतिशय समुद्रासारखे मोठे आणि विशाल आहे. त्यांच्या बाबतीत कितीही लिहिले तरी शब्द अपुरे पडतात असेही आज या ठिकाणी उपस्थित असलेल्या मान्यवरांकडून मोजके शब्दात आपले मनोगत व्यक्त करताना बोलण्यात आले. या प्रसंगी येथे उपस्थित असलेले विस्तार अधिकारी जाधव साहेब, जोशी मॅडम तसेच किस्किंदा ताई, पांचाळ मॅडम, श्रद्धा ताई घाडगे मॅडम, पत्रकार दैनिक कार्यारंभ तसेच दैनिक न्याय टाइम्स चे पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार समुद्रे सर तसेच जाधव मॅडम, सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



धारूर काँग्रेस तालुकाध्यक्ष पदी सिध्देश्वर देवराव रणदिवे यांची त्यांच्या कार्याची दखल घेऊन फेरनिवड करण्यात आली आहे. मागिल पाच वर्षात पक्षासाठी केलेले कार्य व त्यांचा जनसंपर्क पाहुन पक्षाने त्यांची तालुकाध्यक्ष पदी निवड करुन कामाची पावती दिली आहे. त्यांना त्यांच्या फेरनिवडीचे पत्र देण्यात आले. त्यावेळी माजी मंत्री अशोकराव पाटील, पक्षाचे सरचिटणीस आदित्य दादा पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे, प्रवीण शेप, माजी नगराध्यक्ष पशुपती दांगट आदी उपस्थित होते.

## जिल्हा बँक शाखा धारूरचे कर्मचारी व संस्था सचिव यांनी राबवले स्वच्छतेतून सहकार अभियान

धारूर । प्रतिनिधी

किल्लेधारुर येथिल जिल्हा बँकेच्या शाखेच्या वतीने शाखे समोरील परिसरातील कचरा गोळा करून व परिसर स्वच्छ करून आंतरराष्ट्रीय सहकार दिन साजरा केला. मा. जिल्हा उपनिबंधक साहेबांच्या सुचनेनुसार विविध सहकारी विभागात वेगवेगळे उपक्रम हाती घेऊन आंतरराष्ट्रीय सहकार दिन साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने किल्लेधारूर शाखेत स्वच्छता मोहीम राबवून साजरा करण्यात आला. यावेळी बँकेचे व्यवस्थापक अशोक उजगरे, रोखपाल प्रेमानंद तोटेवाड, शिपाई स्वामी, टिसीओ गव्हाणे संस्था सचीव श्रीकृष्ण चोले, विष्णू रंदवे, शेरकर, गायकवाड, मुंडे यांनी स्वच्छता अभियानात भाग घेतला.



## विश्वरत्न अणणाभाऊ साठे जयंती अध्यक्षपदी अक्षय वैरागी यांची निवड

धारूर । प्रतिनिधी

विश्वरत्न साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती दि.१ ऑगस्ट २०२५ रोजी आहे धारूर शहरात प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी जयंती अतिशय उत्साहात साजरी करण्यात येणार आहे त्यानिमित्त कार्यकारणी निवडण्यासाठी दि.०३ जुलै रोजी बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत सर्वांमते अक्षय वैरागे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. धारूर शहरात अनेक वर्षापासून विश्वरत्न अण्णासाहेब साठे यांची जयंती अतिशय उत्साहात साजरी केली जाते. याही वर्षी प्रतिवर्षाप्रमाणे जयंती उत्साहात साजरी करायची असल्याने जयंती पूर्वीच तयारी सुरू करण्यात आली असून तत्पूर्वी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या संदर्भात दि.०३ जुलै रोजी येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वाचनालय येथे बैठक संपन्न झाली.



या बैठकीत सर्वांमते अध्यक्षपदी अक्षय वैरागे व उपाध्यक्षपदी अजय वैरागे व महेश वैरागे यांची निवड करण्यात आली आहे. ही बैठक लक्ष्मण शिरसाठ, संतोष बप्पा शिरसाट, रामकिसन लोखंडे, सुजित वैरागे, माणिक लोखंडे, धोंडीराम वैरागे, बंडू वैरागे, पुंडलिक शिंदे, सुनील कांबळे, शैलेश वैरागे, किरण वैरागे, विशाल वैरागे, प्रदीप सहाणे, सागर वैरागे, आकाश वैरागे, कृष्णा लोखंडे, सचिन लोखंडे, शंकर उपरे, र लोखंडे, विनायक पारवे, रमेश पारक, बालू लोखंडे, दत्ता शिंदे, बंन गायसमुद्रे, करण शिरसाट, कपि शिरसाट, आकाश गायसमुद्रे, आका कसबे, विनोद लोखंडे, जालिन पाटोळे, फकीर शिंदे, विकास कांबळ जिजा शिरसाट आदींच्या उपस्थित संपन्न झाली.

# विरोधकांच्या धमक्या आणि दहशतीला भिक घालू नका : महेश दाभाडे

गेवराई । प्रतिनिधी

मागील वीस वर्ष नगर परिषदेची सत्ता असताना विरोधकांना जे जमलं नाही ते माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी सहा महिन्यांत करून दाखविले. गेवराई शहर विकासाच्या पाठिशी उभे राहणार आहे, हवालदिल झालेले विरोधक आता कार्यकर्त्यांना धमक्या देऊन दहशत पसरविण्याचा प्रयत्न करत आहेत. आम्हीपण गेवराईत राहतो त्यामुळे विरोधकांच्या धमक्या आणि दहशतीला भिक घालू नका असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष महेशअण्णा दाभाडे यांनी केले. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत संजयनगर भागातील कार्यकर्त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रवेश सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. गेवराई शहरात मोठ्या प्रमाणावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये इनकमिंग सुरु आहे. विधानसभा निवडणुकीनंतर माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी कोट्यावधी रुपयांची विकास कामे सुरु केली आहेत. संजयनगरसह इतर भागातील अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर देण्याचे काम करून मागील वीस वर्षापासूनचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढला आहे. शहरातील संजयनगर भाग राष्ट्रवादीमय झाला असून शुक्रवार, दि.४ जुलै रोजी संजयनगर भागातील शेख निजाम, राजेंद्र साळुंके, राम पवार, जहिर शेख, मोहम्मद सिराज, नारायण पवार आदींच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी मान्यवरांची ढोल ताशाच्या गजरात भव्य मिरवणुक काढून जल्लोषात पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम संपन्न झाला.

माजी नगराध्यक्ष महेशअण्णा दाभाडे यांनी आपल्या भाषणात विरोधकांचे वाभाडे काढले. पक्ष प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांना धमकावण्याचे प्रकार घडत असल्याचा त्यांनी खरपूस समाचार घेतला. यावेळी बोलताना ते



म्हणाले की, आम्ही ज्यांच्याबरोबर काम केले इमाने इतबारे केले, आता अमरसिंह पंडित साहेबांच्या सोबत काम करण्याचा निर्धार केला असून कोणत्याही राजकीय पदांच्या अपेक्षेशिवाय त्यांच्या बरोबर निष्ठेने काम करणार आहोत. शहरात या माध्यमातून विकासगंगा येत आहे, अनेक वर्षांपासूनची रखडलेली कामे मार्गी लागल्याचे समाधान आहे. हवालदिल झालेले विरोधक कार्यकर्त्यांना धमक्या देत आहेत, आम्ही सुध्दा गेवराईत राहतो त्यामुळे असल्या धमक्यांना आणि दहशतीला कधीही भिक घालू नका असे आवाहन महेश दाभाडे यांनी आपल्या भाषणात केले. त्यांच्या भाषणाला उपस्थितांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी आपल्या भाषणात विधानसभा निवडणुकीनंतर केलेल्या विकास कामांची माहिती दिली. संजयनगर मधील अतिक्रमण धारकांना पीटीआर देताना पक्षीय भेदभाव केला नाही, जवळचा-लांबचा पाहिला नाही, अनेक वर्षे हक्काच्या पीटीआरसाठी संघर्ष केलेल्या सर्व संजयनगर वासीयांना पीटीआर सोबतच घरकुल देऊन या भागातील रस्ता, विज, पाणी आणि स्वच्छतेचे प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावण्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांची त्यांनी यावेळी उपस्थितांना माहिती दिली. नवीन प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांसह जुन्या कार्यकर्त्यांमध्ये समन्वय करून सर्वांना भविष्यात सन्मानाची वागणुक दिली जाईल असा विश्वास माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी यावेळी व्यक्त केला.

गेवराई विधानसभा मतदारसंघात माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत. शुक्रवार दि. ४ जुलै रोजी गेवराई शहरातील संजयनगर येथे झालेल्या जाहिर कार्यक्रमात संजयनगर येथील शेख निजाम, राजेंद्र सोळुंके, राम पवार, शेख जहीर, महोमंद सिराज, नारायण पवार, संभाजी कोल्हे, पप्पु बांडे, हसन भाई, आप्पासाहेब मोरे, युवराज चव्हाण, दत्ता धुरंधरे, विष्णू मोरे, दिलीप धुरंधरे, नितीन कांडेकर, मोहन पवार, सतिष पवार, विजय पवार, विकास राठोड, आत्माराम गुंजाळ, सतिष राठोड, राजु चव्हाण, कैलास गुंजाळ, दस्तगिर बागवान, बब्बु पठाण, नामदेव बांडे, आयुब शेख, पप्पु डांगे, सलीम शेख, तुळशिराम गायकवाड, लाला सुर्यवंशी, मुखीद तांबोळी, राजु क्षिरसागर, विष्णू वादे, बबन गायकवाड, लखन पवार, बाबा शेख, भागवत काळे, विष्णूपंत कांबळे, अर्जुन चव्हाण, दत्ता चव्हाण, सुनिल चव्हाण, एकनाथ चव्हाण, दिनेश हातागळे, ऋषी कापरे, गणेश शिंगटे, सुभम भापकर, विकास बांडे, संभाजी कोल्हे, ज्ञानेश्वर गायकवाड, सुनिल शेलार, सलीम शेख, अनिस तांबोळी, नितीन कांडेकर, मोहन पवार, सतिष पवार आदींसह श्रीमती सुमन धनवटे, रुख्मीनबाई उपळकर, सविता शिंदे, कमलाबाई डोंगरे, चंद्रकला गुंजाळ, संगिता थोरात, आण्णासाहेब मोटे आदी शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहिर प्रवेश केला. माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये स्वागत केले. यावेळी बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, विनोद सौंदरमल, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष दादासाहेब घोडके, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, माजी नगरसेवक राधेशाम येवले, रविंद्र बोराडे, भास्कर काकडे, जिजा पंडित, सय्यद सुभान, बंटी सौंदरमल, शेख रहिम, सतिष दाभाडे, पप्पु पठाण, जे.के. बाबुभाई, सुभाष गुंजाळ, प्रभाकर भालशंकर, मोईन मौलाना, नासेर तांबोळी, ड. गौतम कांडेकर, ड. अन्सारी, ड. योगेश पाटील, अक्षय पवार, संदिप मडके, रंजित घुंबार्डे, रवि कानाडे, दत्ता दाभाडे, दिनेश कानाडे, विलास निकम, दिनेश घोडके, सय्यद इम्रान, सय्यद बाबुभाई, सय्यद सलमान, नयुम शेख, सय्यद अमर, सोमनाथ गायकवाड, शेख नवाब, राजु पठाण, शेख जावेद निजाम, रफीक बागवान, सय्यद सलीम, सय्यद समीर, सय्यद रिहान, सय्यद अल्ताफ, युसूफ पठाण, सय्यद सिकंदर, शेख मुन्नाभाई, युवराज चव्हाण, माणिकराव माळी, इब्राहीम पठाण यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह संजयनगर भागातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फेरफारच्या नावाखाली आर्थिक अफरातफर: जागाभाडेची पावती संशयास्पद

## तलवाडा ग्रामपंचायत मधील प्रकार; गटविकास अधिकारी कार्यवाही करणार का? ग्रामपंचायत विरोधातील सव्वीस तक्रारी प्रलंबित; वरिष्ठांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष...

तलवाडा । प्रतिनिधी
जागेला वारसा आधारे नाव लावणे, नवीन नावाची नोंद करणे, खरेदीखत आधारे नाव नोंदणी तसेच शपत पत्रा आधारे नाव नोंदणी च्या नावाखाली तलवाडा ग्रामपंचायत मध्ये लाखो रुपयाची उलाढाल झाली असून काहींना नमुना नंबर ७ च्या पावत्या दिल्या आहेत तर काहीना पावत्या न देता पैसे घेतल्याची जोरदार चर्चा सुरू असून जागा भाडे धारक याला चक्क सन २००२ या सालची पावती देण्यात आली असल्याने पंचायत चा सावळा गोधळ आणि भ्रष्ट कारभार समोर आला आहे. या सर्व प्रकरणाची आणि नमुना नंबर ८ तसेच नमुना नंबर ११ या रजिस्टर ची मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांनी तपासणी करून किर्द तपासावी अशी मागणी सध्या होत आहे.
गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत मध्ये मागील तीन ते चार वर्षापासून भ्रष्ट कारभार सुरू असून या बाबत ग्रामपंचायत उपसरपंच आणि सदस्य यांनी तक्रारी केलेल्या आहेत. ग्रामपंचायत सदस्य तथा वरिष्ठ लेखा अधिकारी यांनी सविस्तर निवेदने सादर करून सर्व भ्रष्ट कारभार बंद करावा अशी मागणी वेळोवेळी केली आहे. त्यांनी दिलेल्या जवळपास सव्वीस तक्रारी पंचायत समिती कार्यालय गेवराई, मुख्य कार्यकारी अधिकारी बीड, जिल्हाधिकारी बीड यांच्या कडे प्रलंबित आहेत यावर अद्याप काहीच कार्यवाही झाली नाही. त्यामुळे ह्या प्रकरणाची चौकशी का होत नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यातच मागील एक ते दीड महिन्यापासून तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत असलेला पोइतांडा ग्रामपंचायत विभक्तीकरणाचा प्रस्ताव मंजूर झाल्याने तलवाडा ग्रामपंचायत ला प्रशासक नियुक्त करण्यात आले आहेत. याकाळात पीएमवाय अंतर्गत जवळपास आठशे चाळीस घरकुले मंजूर झाल्याने लाभार्थी समाधानी झाले आहेत. या घरकुलाचे प्रस्ताव दाखल करण्यासाठी जागा आपल्या नावावर असणे गरजेचे असल्याने अनेकांनी आपली वडिलोपार्जित जागा नावावर करण्यासाठी शपत पत्र दिले तर काहींनी खरेदीखत तर काही नागरिकांनी नवीन जागा नावावर करण्यासाठी बाँड दिले आहेत.
या फेरफार प्रकरणात मोठी आर्थिक अफरातराफ झाली असून काहींना पावत्या देण्यात आल्या आहेत तर काहींना पावती न देताच पी टी आर नक्कल देण्यात आल्या आहेत, यासाठी ना जाहीर प्रगटन काढले ना मासिक सभेत मंजुरी घेतली यासह अनेक असे प्रकरणे आहेत ज्या मध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण घेवाण करून पैसे बळकावण्याचा प्रयत्न झाला असल्याने या रेकॉर्ड ची तपासणी गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांनी करावी अशी मागणी करण्यात येत आहे. यामध्येच जागा भाडेधारक याला दहा हजाराची पावती ही चक्क दोन हजार दोन मधली देण्यात आल्याने शंका निर्माण झाली असून या पावतीचा नोंद कीर्द वर आहे का ? ही रक्कम त्याच दिवशी बँकेत जमा करण्यात आली आहे का या सर्व प्रकारची चौकशी करण्यात यावी. तसेच सर्व प्राप्त शपत पत्र, खरेदीखत, बाँड याची पडताळणी करावी. हा सर्व प्रकार सद्य तलवाडा ग्रामपंचायत ला रुजू असलेले ग्रामसेवक तसेच प्रशासक पाहून कार्यवाही करतील का हे येत्या काळात समोर येईल. जर कार्यवाही झाली नाही तर संबंधित अधिकारी यांच्या विरोधात आयुक्त कार्यालय याठिकाणी तक्रार दाखल करण्यात येणार असून वेळ प्रसंगी उपोषण करण्याचा इशारा तलवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी दिला आहे.

# पांदन रस्त्यांसाठी तहसीलसमोर शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

## तहसीलदार साहेब न्याय द्या या घोषणेने परिसर दणाणून सोडला

गेवराई । प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील मादळमोही येथील शेतकऱ्यांचा शेतात जाण्यासाठीचा पानंद रस्ता गावातीलच काही लोकांनी अडवला असून...तो रस्ता तात्काळ मोकळा करून द्यावा या मागणीसाठी शेतकर्यांनी गेवराई तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केल आहे. अनेक वेळा मागणी करून देखील रस्ता मोकळा करून देण्यात आलेला नाही तर न्यायालयीन प्रक्रिया सुरु असल्याचं कारण पुढे करत तहसीलदार या प्रश्नाकडे लक्ष देत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.



सध्या शेतामध्ये कापूस, सोयाबीन यासह फळबागांची देखील लागवड शेतकऱ्यांनी केलेली आहे त्यामुळे मशागत करण्यासाठी शेतात कसं जायचं असा सवाल शेतकऱ्यांनी प्रशासणाला विचारला असून तत्काळ रस्ता मोकळा करून न दिल्यास आत्मदहनाचा इशारा दिला आहे.
पाणंद रस्ते हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार तहसीलदार संदीप खोमणे यांच्याकडून मादळमोही येथील शेतकऱ्यांना न्याय मिळेल अशी अपेक्षा असताना या रस्त्यांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष्य न घालण्याचा प्रकार वारंवार घडत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांत भयंकर संताप निर्माण झाला होता. कृषीप्रधान देश असणांऱ्या या राज्यात शेतकऱ्याला कुटुंबासोबत तहसील कार्यालयासमोर ठिय्या करण्याची वेळ येत आहे हे अतिशय निंदनीय बाब आहे.
दुसरीकडे सरकारच्या वतीने पांदण रस्त्यांच्या प्रश्नांबाबत सरकार मायबाप शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे अशी प्रसिद्धी देण्याच्या उद्देशाने नेतेमंडळी आपलीच थोपटतात मात्र गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे जाणीवपूर्वक मादळमोही येथील पांदण रस्त्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला तसेच वाळू माफिया राजरोजपणे सुरू असल्यामुळे तहसीलदार साहेबांना नागरिकांच्या विविध विषयाकडे लक्ष्य देण्यासाठी वेळ नाही का? असा सवाल करत पांदण रस्त्याच्या संदर्भात वारंवार निवेदन सादर करूनही कारवाई करण्यात येत नसल्यामुळे यामागे संशय व्यक्त करत यामागे राजकीय वरदहस्त कोणाचें? पांदण रस्ता मोकळा करण्यासाठी तहसील प्रशासन का सज्ज नाही असे अनेक संशयित प्रश्न यावेळी उपस्थितांना पडले म्हणून जिल्हाधिकारी महोदयांनी लक्ष घालून हा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी जात आहे.

# पावसाने पाठ फिरवली शेतकऱ्यात चिंतेचे वातावरण

दिंद्रुड । प्रतिनिधी
यावर्षी भर उन्हाळ्यात मे महिन्यात अवकाळी पाऊस झाला. जुनच्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्रात मान्सून दाखल होण्याचे संकेत होते. पावसाच्या आशेने बहुतांश शेतकर्यांनी बी-बियाणे व खते खरेदी केले. काही शेतकर्यांनी लागवड ही केली मात्र पावसाने दगा फटका केल्याने शेतकरी वर्गात चिंता पसरली आहे. बळीराजाची नजर आकाशाकडे असून सांग विधात्या पाऊस पडणार कधी? या प्रश्नाने चिंतातुर शेतकरी हतबल झाला आहे.
दरवर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सून दाखल होत असल्याने शेतकरी वर्गात बी बियाणे, खते खरेदी करण्यास झुंबड उडते. यावर्षी मे महिन्यात अवकाळी पावसाने सर्वत्र पाणीच पाणी केले होते मात्र जून महिन्यात पावसाने दगा दिला.
दिंद्रुड व परिसरातील बहुतांश शेतकर्यांनी उसनवारी, बँकेचे कर्ज घेऊन बियाणांची खरेदी करत लागवड ही केली मात्र पावसाने तडी दिल्याने दुबार पेरणीचे संकट शेतकर्यांवर ओढावले आहे याच कारणाने शेतकरी वर्गात चिंता पसरली आहे. जुलै महिन्यात खुरपणी करण्याच्या हंगामात उगवणच नसल्याने शेतकरी डोक्याला हात लावून बसल्याचा दिसत आहे. पुढील पंधरा दिवस पाऊस येणार नसल्याचे तज्ञांची संकेत शेतकर्यांना अस्वस्थ करताना पाहायला मिळत आहेत. मान्सून दाखल व्हायला वेळ लागत असल्याने यावर्षी उत्पन्नात होणारी घट शेतकर्याला वेदनादायी ठरत आहे.

# बीड नगर परिषदेतील वसुली विभागात ये-जा करणाऱ्या वृद्धांच्या जीवितास धोका!

## वसुली विभाग तिसऱ्या मजल्यावरून खालच्या मजल्यावर हलविण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी
बीड नगर परिषदेतील वसुली विभागात ये-जा करणाऱ्या वृद्धांच्या जीवितास धोका असल्याचे नमूद करून वसुली विभाग इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून खालच्या मजल्यावर हलविण्याची मागणी रमेशराव गंगाधरे आणि एस.एम.युसूफ यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.
याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड नगर परिषदेच्या टोलेजंग इमारतीमध्ये तिसऱ्या मजल्यावर वसुली विभाग आहे. शहरात राहणाऱ्या नागरिकांना या विभागात घरपट्टी, नळपट्टी आणि तत्सम कर भरण्यासाठी जावे लागते. कर भरण्याचे काम बहुतेक करून घरात राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांकडे असते. कर भरण्याकरिता बीड नगर परिषदेत येणारे ज्येष्ठ नागरिक हे साधारण ६०-६५ वर्षांच्या पुढे वय असलेले असतात. या वयात बहुतांश नागरिकांचे हाडे ठिसूळ झाल्याने गुडघे दुखतात. शिवाय



हृदयरोग, रक्तदाब, मधुमेह असलेल्या नागरिकांना तर इमारतीच्या पायऱ्यांवर चालत ये-जा करण्याऐवजी बसून पायऱ्या चढ-उतार करावी लागत असल्याचे दिसत आहे. एकंदरीत वसुली विभाग तिसऱ्या मजल्यावर असल्याने ज्येष्ठ नागरिकांना कर भरण्यासाठी गेल्यानंतर दमादम व्हावे लागत आहे. त्यांना मोठ्या प्रमाणात धापा लागत आहेत. एखाद्या वेळेस श्वासोच्छ्वास कमी अधिक प्रमाणात झाल्यास येथे एखाद्या वृद्धाचा जीव जाण्याचा धोकाही संभवतो. म्हणून बीड नगर परिषदेतील तिसऱ्या मजल्यावरील वसुली विभाग पहिल्या मजल्यावर नगरसेवकांसाठी असलेल्या हॉल मध्ये हलविण्यात यावे.
नगरसेवकांसाठी ठेवण्यात आलेल्या ऐसपैस हॉलचा वापर वर्षातून कधीतरी होतो आणि तिथे मोजकेच नगरसेवक कधीतरी येतात मात्र वसुली विभागात बीड शहरातील हजारो नागरिक दररोज ये-जा करतात. हे लक्षात घेऊन तिसऱ्या मजल्यावरून वसुली विभागाला खाली नगरसेवकांसाठी ठेवण्यात आलेल्या मोठ्या प्रशस्त हॉलमध्ये हलविण्यात यावे. अशी मागणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.




# आषाढी वारीनिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून वारकऱ्यांसाठी एक लाख वारकरी बॅगचे वाटप

पंढरपूर । प्रतिनिधी
महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी उपस्थित राहून वारकऱ्यांना एक अमूल्य भेट दिली. या पवित्र वारीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री यांच्या वतीने ४ जुलै रोजी १ लाख वारकरी बॅगचे मोफत वितरण करण्यात आले. हजारो किलोमीटरचा प्रवास करून विठोबाच्या भेटीला आलेल्या भक्तांसाठी हा उपक्रम अतिशय महत्वाचा ठरला आहे.
या वितरणाचा संयोजनाचा पुढाकार युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव (दादा) चव्हाण यांनी उचलला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण नियोजन व वितरणाची अंमलबजावणी शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. या उपक्रमामुळे लाखो वारकऱ्यांमध्ये आनंदाची आणि समाधानाची आणि कृतज्ञतेची भावना निर्माण झाली होती. वारकऱ्यांनी उपमुख्यमंत्री व आयोजकांचे मन:पूर्वक आभार मानले.

**सेवा हीच खरी भक्ती**

वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हे योगदान सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरले आहे. वारी म्हणजे चालती भागवतधर्माची शाळा, आणि या शाळेतील प्रत्येक भाविक हा ज्ञानेश्वरीचा पाठ शिकणारा विद्यार्थीच, असे म्हणत शिंदे साहेबांनी वारकऱ्यांच्या सेवेस आपले सामाजिक कर्तव्य मानले आहे.

# जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या नेतृत्वात भाजपाच्या मंडळ अध्यक्षांनी घेतली जिल्हाधिकाऱ्याची भेट



बीड । प्रतिनिधी
भारतीय जनता पार्टीचा जिल्ह्यातील सर्व मंडळ अध्यक्षांनी आज जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली माननीय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली व विविध विकास कामा संदर्भात चर्चा करून ती मार्गी लागतील यासाठी माननीय जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना केल्या. बीड जिल्ह्यातील सर्व मंडल प्रमुखांचा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सर्वप्रथम परिचय करून देऊन भारतीय जनता पार्टीच्या या नूतन टीमला आपले सहकार्य असावे अशी इच्छा व्यक्त केली.
याप्रसंगी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मी जनतेच्या हिताच्या कामासाठी सदैव उपलब्ध आहे असी खात्री दिली. याप्रसंगी सर्वप्रथम माननीय जिल्हाधिकाऱ्यांचा भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला. या भेटी प्रसंगी भाजपचे जिल्हा सरचिटणीस देविदास नागरगोजे, गेवराई विधानसभेतील मंडलाध्यक्ष सचिन दाभाडे, राजेंद्र पवार, उद्धव रासकर माजलगाव विधानसभेतील रूपाली कचरे, विनायक रत्नपारखी, अभिजीत साळुंखे, धारूर चे संदीप काचगुंडे वडवणीचे सुखदेव रेडे, अंबाजोगाईचे संजय गंभीरे, गोकुळ कदम, केज चे भगवान केदार परळीचे राजेश गीते, संतोष भगत, बीडचे मनोज पाटील, अशोक लोढा, अशोक रसाळ, राणा डोईफोडे हे सर्व मंडलाध्यक्ष उपस्थित होते.

# घरकुलासाठी मिळणार मोफत पाच ब्रास वाळु, महसुलमंत्र्यांची घोषणा

## उपसरपंच अनिल राधे कांबळे यांच्या पाठपुराव्याला यश

माजलगाव । प्रतिनिधी
शासनाच्या वतीने घरकुल लाभार्थ्यांकरीता मोफत पाच ब्रास वाळु बंद करण्यात आली होती ती आता पुन्हा सुरू होणार असल्याची घोषणा महसुल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली असुन यासाठी ब्रम्हगावचे उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी उपोषण करत पाठपुरावा केला होता. त्याला यश आले आहे. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांच्या वतीने उपसरपंच अनिल राधे कांबळे यांचे आभार मानले जात आहेत.



घरकुल लाभार्थ्यांकरीता मोफत पाच ब्रास वाळुचे वाटप सुरू करण्यात आले होते परंतु मोठा गोंधळ व गैरप्रकार होत असल्याने सदरील वाळु देणे शासनाने बंद केले. परिणामी घरकुल लाभार्थ्यांचे बांधकाम रखडल्याने उपसरपंच अनिल राधे कांबळे यांचेकडे अनेकांनी तक्रारी केल्यानंतर उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी याप्रश्नी शासनाचे व महसुल मंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी भर पावसात उपोषण केले. उपोषणकर्त्यांची तब्येत देखील खालावली होती. याबाबत महसुल मंत्र्यांची देखील अनिल राधे कांबळे यांनी भेट घेतली होती. याची दखल महसुलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेत विधानसभेत लक्षवेधी मांडली म्हटले की, ज्या ग्रामपंचायती मध्ये ज्या नगर पंचायतीमध्ये, ज्या भागामध्ये वाळु घाट आहेत, नदी, नाल्यांवर वाळु उपलब्ध आहे. अशा ठिकाणांहुन तहसिलदारांनी घरकुलासाठी ऑनलाईन पास जनरेट करून ती पास घरकुल लाभार्थ्यांना तलाठ्यांमार्फत घरोघरी पोहच द्यायची आणि घरकुल लाभार्थ्यांनी आपल्या जवळच्या रेती घाटावरून रेती घ्यायची तहसिलदारांनी त्याला आयडेंटीफाय करून द्यायची यातुन घरकुल लाभार्थ्यांना वाळु उपलब्ध होणार आहे. त्यामुळे उपसरपंच अनिल राधे कांबळे यांच्या केलेल्या उपोषणाची दखल प्रशासनाने घेतली असल्याने शहरासह तालुका परिसरातील घरकुल लाभार्थ्यांनी अनिल राधे कांबळे यांचे आभार मानले आहेत.

# आजवर 'हक्काच्या पीटीआर' चा प्रश्न केवळ राजकीय स्वार्थासाठी प्रलंबित ठेवला : अमरसिंह पंडित

## समीर काझी यांनी वक्फ बोर्डाच्या बाजूने अतिशय सकारात्मक प्रतिसाद दिला

गेवराई । प्रतिनिधी
जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री. अमरसिंह पंडित साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई शहरातील अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. शासन जमीनीवरील अतिक्रमण धारकांच्या पीटीआर चा प्रश्न मार्गी लागलेला असताना वक्फ बोर्डाच्या जागेवरील अतिक्रमण धारकांना घरकुलाचा लाभ देण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते. वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना. समीर काझी व माजी आमदार श्री. अमरसिंह पंडित साहेब यांच्या उपस्थितीत आज नगर परिषद सभागृहात बैठक संपन्न झाली. श्री. समीर काझी यांनी वक्फ बोर्डाच्या बाजूने अतिशय सकारात्मक प्रतिसाद देत गेवराई शहरातील ४३८ रहिवाशी कुटूंबांना पीटीआर देणे बाबत कायदेशीर बाजू तपासून कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.
आजवर 'हक्काच्या पीटीआर' चा प्रश्न केवळ राजकीय स्वार्थासाठी प्रलंबित होता. हा प्रश्न प्रलंबित ठेऊन आजवरच्या सत्ताधाऱ्यांनी



केवळ त्याचा राजकीय लाभ घेतला. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारा दरम्यान अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर देण्याचा शब्द दिला होता. निवडणुकीनंतर शंभर दिवसांत प्रातिनिधीक स्वरुपात पीटीआरचे वाटप करून त्याची आश्वासपूर्ती केली. सुरुवातीला मर्यादीत वाटणाऱ्या या प्रश्नांची दिवसेंदिवस व्यापकता वाढत आहे. एकट्या संजयनगर भागात सुमारे १४०० कुटूंबांचे फेर सर्व्हेक्षण करून त्यांना पीटीआर देण्याची बाब काही दिवसांत पूर्ण होणार आहे. संजयनगर सह इतर भागातही अतिक्रमण धारकांना पीटीआर मिळणार आहे. जात-धर्म आणि पक्ष याचा कोणताही विचार न करता सर्वांना सरसकट पीटीआर देण्याचे काम आम्ही करत आहोत.
वक्फ बोर्डाच्या जागेवर सुमारे २५ वर्षांपूर्वीपासून वास्तव्यास असलेल्या आणि ज्यांच्याकडे वास्तव्याचे पुरावे आहेत अशा कुटूंबियांना वक्फ बोर्डाच्या सहकार्याने पीटीआर उपलब्ध करून त्यांना घरकुल देण्यासाठी प्रसंगी शासन स्तरावर सुध्दा प्रयत्न करणार आहे. आजच्या बैठकीला वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना. समीर काझी, जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा माजी आमदार श्री. अमरसिंह पंडित साहेब, वक्फ बोर्डाचे उपकार्यकारी अधिकारी मुशीर शेख, जिल्हा व्यवस्थापक आरसलान शेख, नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके व माजी नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे यांच्यासह वक्फ बोर्ड आणि नगर परिषद व महसुल विभागाचे संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीला तय्यबनगर भागातील रहिवाशी, अल्पसंख्यांक समाजातील नागरीक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेवराई शहरातील अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर उपलब्ध करून त्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी कटिबध्द असल्याचा विश्वास व्यक्त केला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT